# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

**☏/ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web.ropune.org.in**

जा.क्र.विकापु/विवि/ॲक्रीडीटेशन/२०११-१२/९८८२ दिनांक :०८/१२/२०११

प्रति,
प्राचार्य/ संचालक,
शासकीय / शासकीय अनुदानित / विनाअनुदानित
पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माण शास्त्र /वास्तुशास्त्र
पदव्यूत्तर पदवी एम बी ए / एम सी ए संस्था

विषय : **एनबीए ॲक्रीडीटेशन संदर्भात संस्थांना प्रोत्साहीत करण्याबाबत**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.१९/क्युएसेल/२०११/२१ दिनांक ०८/११/२०११

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व शासकीय / शासकीय अनुदानित / विनाअनुदानित पदवी अभियांत्रिकी /औषधनिर्माण शास्त्र /वास्तुशास्त्र आणि पदव्यूत्तर पदवी एम बी ए / एम सी ए संस्थाना कळविण्यात येजे की, ब-याच संस्था एनबीए ॲक्रीडीटेशन करीता अर्हताप्राप्त झालेल्या असतानासुध्दा अशा संस्थांनी एनबीए ॲक्रीडीटेशनसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या कडे अर्ज सादर केलेल नाहीत. तसेच ज्या संस्थांनी अर्ज दाखल केलेले आहेत त्यांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यकडे पाठपुरावा केलेला नसल्यामुळे जवळपास दोन तीन वर्षापासून त्यांच्या एनबीए ॲक्रीडीटेशन संदर्भात सद्यस्थिती ‘‘अर्ज दाखल केलेला आहे’’ एवढीच निदर्शनास येते.

दिवसेंदिवस व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांची संख्यात्मक वाढ झपाटयाने झालेली असल्यामुळे, त्यांचे गुणात्मक दर्जाचे मुल्यांकण करणे अत्यंत गरजेचे झालेले असल्याने या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या एनबीए ॲक्रीडीटेशन करीता अर्हताप्राप्त झालेल्या सर्व संस्थांना आणि ज्यानी पूर्वी अर्ज केलेला आहे परंतू अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यकडे पाठपुरावा केलेला नाही अशा सर्व संस्थांनी आपल्या संस्थेचे एनबीए ॲक्रीडीटेशन करुन ध्यावे. तसेच आपण याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डि. एन. शिंगाडे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे